# पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- तळोजे मजकूर या महसूली गावातील सर्व्हे नं. ११३ मधील विद्यमान रस्त्यापासून ते मौजे- तुर्भे या महसूली गावातील सर्व्हे नं. ४८ पर्यंत २४.०० मी. रूंदीच्या रूंदीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५, २०६, २०७ व २०९ नुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजना रस्त्याचे व ना-बांधिव क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- तुर्भे, ता. पनवेल येथील श्रीम. तेजश्री राजेश म्हात्रे व इतर यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित २४.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत व ना-बांधिव क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- तुर्भे, सर्व्हे नं. १/४ रस्त्यासाठी बाधीत व ना-बांधिव क्षेत्र – ८८०.०० चौ. मी.

त्यास मोजणी नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : लागून हिस्सा नं. १/६, १/७ -
पश्चिमेस : लागून हिस्सा नं. १/३
दक्षिणेस : लागून हिस्सा नं. १/५
उत्तरेस : लागून हिस्सा नं. १/१, १/२ -

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

PANVEL MUNICIPAL CORPORATION पनवेल महानगरपालिका पनवेल-रायगड PANVEL-RAIGAD

सहाय्यक संचालक, नगररचना
पनवेल महानगरपालिका

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२५/2066 /२०२५ दिनांक : 24/03/२०२५

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.